# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)**

32 वा, मजला, सेंटर-1 बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई - 400005.

दुरध्वनी - (022) 22151824, फॅक्स - (022) 22151867

ई मेल - info.mahasecurity@maharashtra.gov.in, Website : http://www.mahasecurity.gov.in/


## 500 महिला सुरक्षा रक्षकांची [कंत्राटी] प्रतीक्षाधीन यादीसाठी जाहिरात

**[अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख 15/03/2018 सायं 17.00 वाजेपर्यंत]**

**[अर्जाचे प्रक्रिया शुल्क रु. 200/- (Non Refundable) परिच्छेद 8 पहा]**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, **कंत्राटी पध्दतीवर** तसेच खालील अटी व शर्तीवर 500 **महिला सुरक्षा रक्षकांच्या** प्रतीक्षाधीन यादीकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती**

| अ. क्र. | निकष | महिला उमेदवार |
|---|---|---|
| 1 | वयोमर्यादा | 18 ते 28 वर्षे [28/02/1990 ते 28/02/2000 दरम्यान जन्मलेले उमेदवारच पात्र] |
| 2 | उंची, वजन | 1. उंची - 160 से.मी. पेक्षा कमी नसावी.<br>2. वजन - 45 कि.ग्रॅ. पेक्षा कमी नसावे. |
| 3 | अधिवास निकष | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| 4 | शारिरीक चाचणी | 800 मीटर धावणे. [50 गुण] |
| 5 | शैक्षणिक पात्रता | उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा HSC [12 वी] पास. |
| | 12वी च्या गुणांचे भार प्राधान्य [First attempt] [Weightage] | 12वी परिक्षेत 70% पेक्षा अधिक गुण - 50 गुण<br>12वी परिक्षेत 60% ते 70% गुण - 40 गुण<br>12वी परिक्षेत 50% ते 60% गुण - 30 गुण<br>12वी परिक्षेत 40% ते 50% गुण - 10 गुण<br>12वी परिक्षेत 40% पेक्षा कमी गुण - 00 गुण |
| 6 | **कंत्राटानुसार मोबदला** | **मासिक रु.** 14,000/- [Less-EPF+ESIC+PT= **नक्त रुपये** 12,370/-] |

2. **अटी व शर्ती**

2.1. **महिला सुरक्षा रक्षक म्हणून मुंबई शहरात काम करण्याची तयारी असणाऱ्यांनीच अर्ज करावेत.**

2.2. **सदरचे कर्तव्य हे कंत्राटी स्वरुपाचे राहील. सुरक्षा रक्षकांबरोबरच्या कंत्राटास भविष्यात कधीही कायम स्वरुप येणार नाही.**

2.3. कंत्राटा दरम्यान सुरक्षा रक्षकास कोणत्याही राजकीय, कामगार अथवा व्यवसायिक संघटनेचा [Union] सदस्य होता येणार नाही, अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच वर नमुद अथवा इतर कोणत्याही संघटनेच्या कसल्याही प्रकारच्या कारवायांमध्ये भाग घेता येणार नाही.

2.4. महामंडळाकडे सुरक्षेची मागणी करणाऱ्या आस्थापना [Clients] यांच्या मागणी नुसार कर्तव्य देण्यात येईल.

2.5. कोणत्याही उमेदवाराचे कंत्राट, कोणत्याही दिवशी, कोणतीही पूर्व सुचना तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा [Terminate] हक्क महामंडळाकडे राहील.

2.6. प्रतीक्षाधीन यादीवरील निवड झालेल्या उमेदवारास 4 आठवडयांचे प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षणासाठी येणारा खर्च रु. 6000/- उमेदवारास प्रशिक्षणास जाण्यापूर्वी "Maharashtra State Security Corporation, Mumbai" यांच्या नावे देय असलेला "DD" ठेव म्हणून [Deposit] महामंडळाकडे प्रशिक्षणास येताना जमा करावा लागेल.

सदरची रक्कम सेवेत रूजू झाल्यानंतर व पहिल्या कंत्राटाचा कालावधी [11 महिने] पूर्ण झाल्यावर एकरकमी परत करण्यात येईल.

प्रशिक्षणा दरम्यान अथवा पहिल्या कंत्राटाचा कालावधी पूर्ण न करता सोडून जाणाऱ्या उमेदवारांचे डिपॉजिट परत केले जाणार नाही.

3. सुरक्षा रक्षकांना चाचणीस येणेसाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय नसतील.

4. सुरक्षा रक्षकांना महामंडळासोबतच्या करारात असतांना कोणतीही नोकरी अथवा धंदा, **[पुर्णवेळ किंवा अंश कालीन]** करता येणार नाही.

5. महामंडळाबरोबर कंत्राट झाल्यानंतर उमेदवारांस राज्य कामगार विमा योजनेचे / कामगार भविष्यनिर्वाह निधी [ESIC/EPF] लाभ देय होतील.
6. **पात्र व इच्छुक उमेदवारांनी** http://www.mahasecurity.gov.in/applicationform.php **या वेब - लिंकवर** online **अर्ज भरावा.**
7. **ही जाहिरात आणि अर्जाचा नमुना** www.mahasecurity.gov.in **या वेबसाईटवर** Advertisement **या** tab **मध्ये उपलब्ध आहे. आपले अर्ज दि.** 15/03/2018 **रोजी सायं.** 17.00 **वाजेपर्यंत सादर करावे.**
8. **सदर अर्ज कोठल्याही** smart phone **वरून** / internet **असलेल्या** computer **वरून सदर वेब लिंकद्वारे भरता येईल. दुसऱ्या कोठल्याही पध्दतीने अर्ज पाठवू नयेत.**
9. अर्जासोबत भरावयाचे **प्रक्रिया शुल्क रू.** 200/- **(Non Refundable)** हे अर्जात नमूद Payment gateway वरून कोणत्याही Debit Card / Credit Card द्वारे अथवा Net Banking Option द्वारे करणे आवश्यक राहील.
10. प्रतीक्षाधीन यादी निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये तसेच वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकार महामंडळास असेल.
11. **प्रतीक्षाधीन यादीच्या संख्येत वाढ / घट करण्याचा अधिकार महामंडळाकडे राहील.**
12. **अर्ज भरण्याबाबतच्या अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र.** 8433902972/022-22151670/22151824 **वरती संपर्क साधावा.**

- **महत्वाची सूचना :-**

(१) महिला सुरक्षा रक्षक प्रतीक्षाधीन यादी – २०१८ च्या अनुषंगाने मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना त्यांनी Online फॉर्म भरताना स्वतःचा जो भ्रमणध्वनी क्रमांक दिलेला आहे. त्यावर संदेश पाठविण्यात येतील.

(२) उमेदवारांनी महामंडळाचे **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळावर Employee Corner मध्ये महत्वाच्या सूचनांसाठी वेळोवेळी पाहावे.